साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य,
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे-४११००५
020-25538041 ते 44, Ext.no.317 commsugarvikas@gmail.com

जा.क्र.साआ/विकास/ ऊस तोडणी पैसे मागणी /५६७/२०२५ दिनांक-१० .१०.२०२५

ऊस तोडणी मजूर व मुकादम व वाहतूक कंत्राटदार यांचेकडून ऊस तोडणी करिता पैशांची मागणी होत असल्यास कारवाई करणेबाबत.

## *परिपत्रक*

ऊस तोडणी मजूर व मुकादम व वाहतूक कंत्राटदार यांचेकडून ऊस तोडणी करताना, ऊस पिक चांगले नाही, ऊस खराब आहे, ऊस पडलेला आहे, ऊस क्षेत्र अडचणीचे आहे, तोडणी करणे परवडत नाही अशी विविध कारणे सांगून ऊस तोडणीसाठी शेतक-यांकडून रोख पैशांची व अन्य वस्तू/ सेवा यांची मागणी केली जाते. ऊस तोडणी मजूर व मुकादम यांच्या मागणीप्रमाणे शेतक-यांनी पैसे दिले नाही तर ऊस तोडणीस टाळाटाळ केली जाते/ऊस योग्य प्रकारे तोडला गेला नाही अशा प्रकारच्या आर्थिक पिळवणूकीच्या तक्रारी ऊस उत्पादक शेतकऱ्यांकडून वारंवार होत आहेत.

२. राज्यात चालू २०२५-२६ गाळप हंगामात उपलब्ध असलेला सर्व ऊस सर्वसाधारणपणे १४५-१५० दिवसांत गाळप होईल एवढी साखर कारखान्यांची स्थापित गाळप क्षमता वाढली असल्याने शेतकऱ्यांनी आपला ऊस गाळप होईल की नाही याबाबत शंका घेऊन ऊस लवकर गाळपास जावा याकरिता अनुचित मार्गाचा अवलंब करू नये. प्रादेशिक सह संचालक (साखर) व साखर आयुक्त कार्यालयाचे स्तरावरही ऊस गाळपाच्या संदर्भात नियमितपणे आढावा घेतला जाणार असून कोणत्याही ऊस उत्पादक शेतकऱ्याचा ऊस शिल्लक राहणार नाही याचे नियोजन करण्यात येत आहे.

३. शेतक-यांची आर्थिक पिळवणूक रोखण्यासाठी सर्व कारखान्यांनी जाहीर प्रकटन करून अशा प्रकरणातील गैरव्यवहाराला आळा बसेल असे पाहावे. तसेच ऊस उत्पादक शेतकऱ्यांना तक्रार करण्यासाठी मोबाईल फोन / व्हॉटसॅप क्रमांक जारी करावा व याबाबतची माहिती शेतक-यांना वेळोवेळी देण्यात यावी.

४. सर्व सहकारी साखर कारखान्यांच्या कार्यकारी संचालक व खाजगी साखर कारखान्यांच्या जनरल मॅनेजर / मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्राप्त तक्रारींचे निवारण करण्यासाठी खालील प्रमाणे सूचना देण्यात येत आहे.

१. अशा स्वरुपाच्या प्राप्त तक्रारींचे निराकरण करणेसाठी कारखान्यांनी तक्रारनिवारण अधिकारी म्हणून शेती विभागाच्या वरिष्ठ अधिका-यांची नेमणुक करावी.

२. सदर तक्रारनिवारण अधिकारी यांचे नाव, संपर्क मोबाईल नंबर याची माहिती कार्यक्षेत्रातील व कार्यक्षेत्राबाहेरील ऊस तोडणी होत असलेल्या गावांमध्ये कारखान्याच्या गट ऑफिसवर व ग्रामपंचायतीच्या सूचना फलकावर प्रसिद्ध करावी.

३. याबाबतची व्यापक प्रसिद्धी सर्व प्रसिद्धी माध्यमांद्वारे शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवावी.

४.शेतक-यांनी लेखी स्वरूपात अशी तक्रार साखर कारखान्याकडे परिशिष्ट - अ मधील नमुन्यात घटना घडल्यावर लगेच करावी व त्याची पोहच घ्यावी. या कामाकरिता नेमलेल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सदर तक्रारीचे निवारण सात दिवसात करावे.

५. तक्रारीमध्ये तथ्य आढळून आल्यास कार्यकारी संचालक/ जनरल मॅनेजर यांनी सदरची रक्कम मजूर / मुकादम / वाहतुक कंत्राटदार यांचे बिलातून वसूल करून संबंधित शेतकऱ्यांना अदा करावी .

६. सदर तक्रारीचे निवारण कारखान्याकडून न झाल्यास ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी संबंधित प्रादेशिक सहसंचालक (साखर) यांच्याकडे खाली दिलेल्या ईमेलवर तक्रार करावी व प्रादेशिक सहसंचालक (साखर) यांनी सत्यता पडताळून प्राप्त तक्रारीचे निवारण करावे. सुलभ संदर्भाकरिता प्रादेशिक सहसंचालक (साखर) यांचे कार्यक्षेत्र व ईमेल आयडी खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | प्रादेशिक सहसंचालक (साखर) | कार्यक्षेत्रातील जिल्हे |
|---|---|---|
| १ | प्रादेशिक सहसंचालक (साखर), पुणे<br>rjdpunesugar@gmail.com | पुणे, सातारा |
| २ | प्रादेशिक सहसंचालक (साखर), कोल्हापूर<br>rjdkop@gmail.com | कोल्हापूर, सांगली, रत्नागिरी, सिंधुदूर्ग |
| ३ | प्रादेशिक सहसंचालक (साखर), अहिल्यानगर<br>rjdahmednagar@rediffmail.com | अहिल्यानगर, नाशिक, |
| ४ | प्रादेशिक सहसंचालक (साखर),छत्रपती संभाजीनगर<br>rjdaurangabad१२३@gmaill.com | छत्रपती संभाजी नगर , बीड, जालना, जळगाव, धुळे, नंदुरबार |
| ५ | प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड<br>rjdsnanded@gmail.com | नांदेड, लातूर, परभणी, हिंगोली |
| ६ | प्रादेशिक सहसंचालक (साखर), अमरावती<br>rjdamr@gmail.com | अमरावती, अकोला, बुलडाणा, यवतमाळ, वाशिम |
| ७ | प्रादेशिक सहसंचालक (साखर), नागपूर<br>rjdsugar_nagpur@rediffmail.com | नागपूर, भंडारा, गोंदीया, चंद्रपूर, गडचिरोली. |
| ८ | प्रादेशिक सहसंचालक (साखर), सोलापूर<br>rjdsugarsolapur2@gmail.com | सोलापूर, धाराशिव |

५. ऊस उत्पादक शेतकऱ्यांची ऊस तोडणी मजूर / मुकादम / वाहतुकदार यांचेकडून आर्थिक पिळवणूक होत असल्याच्या तक्रारी चालू गाळप हंगामात येणार नाही याची कार्यकारी संचालक व खाजगी साखर कारखान्यांच्या जनरल मॅनेजर / मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दक्षता घ्यावी.

Digitally signed by
SANJAY GENDRAJ KOLTE
Date: 10-10-2025
13:47:40
(डॉ.संजय कोलते)
आयुक्त (साखर)

ठिकाण- पुणे
दिनांक - .१०.२०२५

प्रति :

1. प्रादेशिक सहसंचालक (साखर), सर्व
2. कार्यकारी संचालक, सहकारी साखर कारखाने, सर्व.
3. जनरल मॅनेजर / मुख्य कार्यकारी अधिकारी, खाजगी साखर कारखाने, सर्व.
4. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ मर्या.,साखर भवन, ११ वा मजला, नरिमन पॉईट, मुंबई- २१
5. कार्यकारी संचालक, वेस्ट इंडियन शुगर मिल्स् असोसिएशन लि., पुणे.

प्रत-माहितीस्तव

मा.प्रधान सचिव (सहकार व पणन), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहितीस्तव सविनय सादर

परिशिष्ट - अ

दिनांक

प्रति,

--------------------------------

--------------------------------

--------------------------------

१. अर्जदार ऊस उत्पादक शेतकऱ्याचे नाव -

२. पत्ता-

३. सभासद क्र. / नोंदणी क्र.-

४. मोबाईल क्रमांक -

५. ऊस क्षेत्र गट क्रमांक व उसाची जात -

६. ऊस तोडणी पैसे मागणी संदर्भातील तक्रारीचे स्वरूप -

७. घटना दिनांक व तपशील -

८. संबंधित मजूर / मुकादम / वाहतुकदार यांचे नाव व वाहन क्रमांक -

९. सोबत सादर केलेले पुरावे - १)

२)

३)

अर्जदाराची सही